आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१५ फेब्रुवारी २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेच्या सभापतींविरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात होणार

- उत्पादन वाढ, सेवा आणि एमएसएमई क्षेत्रामुळे व्यापार करारांमध्ये वाटाघाटी करण्यासाठी भारत सक्षम झाला असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- सेंट्रल बँक डिजीटल चलन आधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- टी–ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत कोलंबो इथं होत असलेल्या सामन्यात नाणेफेक जिंकून पाकिस्तानचं भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रण

**<><><><>**

लोकसभेचं कामकाज सुट्टीनंतर ९ मार्चला पुन्हा सुरू झाल्यानंतर सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान घेतली जाईल, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजु यांनी वृत्तसंस्थेला दिली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्चला सुरु होईल, या टप्प्यात काही विधेयकं चर्चेला येतील, यात एक महत्त्वाचं विधेयक आहे, असं त्यांनी सांगितलं. पहिल्याच दिवशी ९ मार्चला सभापतीं विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा होईल आणि त्यानंतर मतदान होईल, असं रिजिजु म्हणाले.

**<><><><>**

भारताचे मुक्त व्यापार करार हे कापड, चर्मोद्योग, रसायनं, हस्तकला, रत्नं आणि इतर क्षेत्रातल्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना बाजारपेठांमध्ये जास्तीत

जास्त प्रवेश मिळावा, या दृष्टीनं तयार केले आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले की, उत्पादन वाढ, सेवा आणि एमएसएमई क्षेत्रामुळे व्यापार करारांमध्ये वाटाघाटी करण्यासाठी भारत सक्षम झाला आहे. या वर्षीचा केंद्रीय अर्थसंकल्पही भारताच्या विकसित राष्ट्र बनण्याच्या प्रेरणेतून तयार झाल्याचं मोदी म्हणाले. यापूर्वीच्या यूपीए सरकारच्या आर्थिक गैरव्यवस्थापनामुळे अशा करारांमध्ये वाटाघाटी करायला ते सरकार असमर्थ ठरल्याची टीका मोदी यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

शहरांच्या विकासाकरता एक लाख कोटी रुपयांच्या यूसीएफ- अर्बन चॅलेंज  फंडाला मंजुरी देण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाचं  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वागत  केलं आहे. उच्च दर्जाच्या शहरी पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी या फंडातून निधी उपलब्ध करून दिला जाईल, यामुळे शहरं देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका निभावतील असं प्रधानमंत्री म्हणाले. यूसीएफ ही गृहनिर्माण आणि नगर विकास मंत्रालयाची योजना आहे, सर्वसमावेशक, काटक, विधायक आणि पर्यावरणाला अनुकूल शहरांची उभारणी करणं हे याचं उद्दिष्ट आहे. या योजनेमुळे पुढल्या पाच वर्षांत शहरी भागात चार लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

**<><><><><>**

बांगलादेशात नवनिर्वाचित सरकारचा शपथविधी येत्या मंगळवारी ढाका इथं होणार आहे. नवनिर्वाचित संसद सदस्यांचा शपथविधी सकाळी तर नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी संध्याकाळी चार वाजता होईल. या समारंभासाठी भारत, चीन, पाकिस्तानसह १३ देशांच्या प्रमुखांना निमंत्रित केलं आहे. भारतातर्फे लोकसभेचे सभापती ओम बिर्ला या समारंभाला उपस्थित राहतील.

या महत्त्वाच्या कार्यक्रमात लोकसभेच्या सभापतींचा सहभाग हा दोन्ही देशांना जोडणाऱ्या लोकशाही मूल्यांप्रति भारताच्या वचनबद्धतेची पुष्टी करत असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाशिवरात्रीचा उत्सव आज देशभरात भक्तीभावाने साजरा होत आहे. काशीविश्वनाथ, ओंकारेश्वर, घृष्णेश्वर, महांकाल, सोमनाथ, परळी वैजनाथ, त्र्यंबकेश्वर, रामेश्वर अशा प्रसिद्ध ज्योतिर्लिंगांसह ठिकठिकाणच्या शिवमंदिरांमधे आज पहाटेपासून भाविकांची गर्दी झाली आहे. दर्शनासाठी रांगा लागल्या आहेत. ठिकठिकाणी महादेव मंदिरांमधे शासकीय पूजा आणि अभिषेकही करण्यात येत आहे. चारधामपैकी बाबा केदारनाथ मंदिराचे दरवाजे येत्या २२ एप्रिलला उघडले जाणार असल्याची घोषणा आज महाशिवरात्रीच्या दिवशी करण्यात आली.

देशभरात गावोगावी महाशिवरात्रीनिमित्त जत्रा भरल्या आहेत.

**<><><><><>**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योग तज्ज्ञांची प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असल्याचं विद्यापीठ अनुदान आयोगानं म्हटलं आहे. या क्रमवारीत तमिळनाडू पहिल्या क्रमांकावर असून गुजरात तिसऱ्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज गुजरातमधे गांधीनगर इथं CBDC अर्थात केंद्रिय बँक डिजिटल चलन आधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचं उद्घाटन केलं. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयातला भ्रष्टाचार यामुळे संपुष्टात येईल असा विश्वास यावेळी शहा यांनी व्यक्त केला. यापूर्वी नक्षलग्रस्त किंवा संघर्षग्रस्त भागात पाच किलो अन्नही गरिबापर्यंत पोहचत नसे, मात्र या प्रणालीचं

डिजिटायजेशन झाल्यामुळे आता त्यांच्यापर्यंत अन्न पोहोचणं सुलभ होईल, असंही ते म्हणाले…

**होल्ड बाईट शहा (१९ सेकंद)**

**<><><><><>**

टी–ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज अ गटात भारत-पाकिस्तान यांच्यातली लढत श्रीलंकेत कोलंबो इथं होत आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १४ षटकात २ बाद १२५ धावा झाल्या होत्या.

दोन्ही संघांनी आपापले पहिले २ सामने जिंकून प्रत्येकी ४ गुण मिळवले आहेत. आजच्या लढतीतल्या यशापयशावर त्यांचं उपान्त्य फेरीतलं स्थान ठरेल.

क गटात मुंबईच्या वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यात वेस्ट इंडीजनं नेपाळवर ९ गडी आणि २८ चेंडू राखून विजय मिळवला. नेपाळनं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून १३३ धावा केल्या. वेस्ट इंडीजनं एक गडी गमावून १५ षटकं आणि २ चेंडूतच ही धावसंख्या पार केली.

अ गटात चेन्नई इथं झालेल्या सामन्यात अमेरिकेनं नामिबियावर ३१ धावांनी विजय मिळवला. अमेरिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ४ गड्यांच्या मोबदल्यात १९९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना, नामीबियाला ६ गडी गमावून १६८ धावाच करता आल्या.

**<><><><><>**

कतार खुल्या टेनिस स्पर्धेत चेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोवाने कॅनडाच्या व्हिक्टोरिया म्बोको हिचा ६-४, ७-५ असा पराभव करत स्पर्धेचं जेतेपद पटकावलं. या सामन्यात मुचोवाने कमीत कमी चुका करत एक तास ३४ मिनिटांत विजय मिळवला. मुचोवाने २०१९ नंतर पहिल्यांदाच डब्ल्यू टी ए चा किताब जिंकला आहे.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर नैतिक, सर्वसमावेशक आणि जबाबदारीनं व्हावा यासाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय इंटेल इंडियासोबत मिळून उद्यापासून देशभरात मोहिम राबवणार आहे. विश्वासार्ह आणि मानव केंद्रित एआय परिसंस्था तयार करणं हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे, असं मंत्रालयानं म्हटलं आहे. यावेळी लोकांना एआयचा जबाबदार वापर करण्याबद्दल प्रतिज्ञा दिली जाईल, त्याआधी त्यांच्याकडून एक प्रश्नावली भरून घेतली जाईल. उद्यापासून नवी दिल्लीत इंडिया एआय इम्पॅक्ट समिटला सुरुवात होणार आहे, त्या पार्श्वभूमीवर या मोहिमेद्वारे नागरिकांशी संवाद साधला जात आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं ए आय एक्सपो २०२६ चं उद्घाटन करतील. ५ दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात १३ देश सहभागी होणार आहेत. विविध क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेचा प्रभाव आणि नागरिकांना त्यातून होणारा फायदा विषद करणारी ५०० पेक्षा जास्त विशेष सत्र, थेट प्रत्यक्षिकं यांचा यात समावेश असेल. जागतिक स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ६०० पेक्षा जास्त स्टार्ट अप यात सहभागी होतील.

**<><><><><>**

बर्लीनमध्ये भारत पर्व अंतर्गत आयोजित वेव्हज् बाजार मधे जागतिक सिनेमाचे तज्ञ, तंत्रज्ञान नवोन्मेषक आणि धोरणकर्ते एकत्र जमले होते. एनएफडीसी अर्थात राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळानं या कार्यक्रमाचं यजमानपद भूषवलं. यावेळी सिनेमा, माध्यम आणि सर्जनशील तंत्रज्ञान क्षेत्रात भारताच्या वाढत्या प्रभावाविषयी चर्चा झाली. या कार्यक्रमात दिल्ली राज्य  सरकार आणि महाराष्ट्र सरकारनं आपापला धोरणात्मक अजेंडा सादर केला. चित्रपट निर्मात्यांसाठी

दिल्लीनं सुधारित धोरणं आखल्याचं दिल्लीचे पर्यटन, कला आणि सांस्कृतिक मंत्री कपिल मिश्रा यांनी सांगितलं.

महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार यांनीही महाराष्ट्र चित्रपट नगरीवरचं सादरीकरण केलं. मराठी सिनेमाच्या सर्जनशील आणि व्यावसायिक क्षमतेचं सादरीकरणही महाराष्ट्राच्या शिष्टमंडळानं केलं.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज जर्मनीमध्ये म्युनिक सुरक्षा परिषदेचे अध्यक्ष वुल्फगँग इशिंगर यांच्याशी संवाद साधला. यंदाच्या म्युनिक सुरक्षा परिषदेत विचारांची आणि दृष्टीकोनाची देवाण-घेवाण करण्याची चांगली संधी मिळाली असं जयशंकर यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

परिषदेच्या पार्श्वभूमीवर जयशंकर यांनी रोमानियाचे परराष्ट्रमंत्री ओना-सिल्विया त्सोईउ यांचीही भेट घेतली.

जयशंकर यांनी एपीएम टर्मिनल्सचे सीईओ कीथ स्वेंडसन यांची भेट घेतली. भारताबरोबर सागरी पायाभूत सुविधा आणि संबंधित उपक्रम पुढे नेण्याच्या स्वेंडसन यांच्या वचनबद्धतेची त्यांनी प्रशंसा केली.

**//<><><><><>//**